# नाशिक महानगरपालिका, नाशिक

घनकचरा व्यवस्थापन विभाग

**राजीव गांधी भवन, मुख्यालय, शरणपूर रोड, नाशिक.-४२२००२**

---

जा.क्र.मनपा/घ.व्य.वि./कार्या.क्र.९/ /२०२० दिनांक / /२०२०

**आदेश**

**विषय:- <u>करोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना</u>**
**नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी, कामाचे ठिकाणी व वाहतूकी दरम्यान मास्क न वापरणाऱ्या व्यक्तींविरूध्द दंडात्मक कारवाई करणे.**

**संदर्भ:-** १. साथरोग अधिनियम, १८९७
२. अधिसूचना क्रमांक करोना, २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५, दिनांक १३ मार्च, २०२०.
३. भारतीय दंड संहिता कलम १८८.
४. मा.महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र.डीएमयु/२०२०/सी.आर.९२/डीआयएसएम.१, दिनांक ३१ मे, २०२०.
५. या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.मनपा/घ.व्य.वि./कार्या.क्र.९/८४८/२०२० दिनांक १५/०६/२०२०

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यात दिनांक १३ मार्च, २०२० च्या अधिसूचनेनुसार , अधिसूचनेच्या दिनांकापासून साथरोग अधिनियम १८९७ ची अंमलबजाव णी सुरू झालेली आहे , त्याअर्थी, साथरोग अधिनियम, १८९७ च्या खंड २, ३ व ४ नुसार प्रदान करणेत आलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र शासन राज्यात करोना विषाणूमुळे उदभवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी प्रसिध्द करणेत आलेल्या नियमातील कलम १० अन्वये आयु क्त, महानगरपालिका यांना प्रदान करणेत आलेले आहे . त्यानुसार, नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोविड -१९ आजाराच्या पार्श्वभूमीवर आवश्यक प्रतिबंधात्मक कार्यवाही करणेत येत आहे.

आणि ज्याअर्थी, कोविड-१९ सारख्या महामारीचा संसर्ग हा थुंकीच्या माध्यमातून होत असल्या चे निष्पन्न झाल्याने अतिदक्षता घेणे जनतेच्या हिताकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजना आवश्यक आहे . त्यास्तव, साथरोग अधिनियम, १८९७ व वेळोवेळीचे शासन निर्णय, परिपत्रके, आदेश, अधिसुचना अन्वये नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी मास्क न वाप रणाऱ्या व्यक्तींविरूध्द दंडात्मक कारवाई करणे सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचे आहे.

आणि ज्याअर्थी , मा.महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र .डीएमयु/२०२०/सी.आर.९२/डीआय एसएम.१, दिनांक ३१ मे, २०२० नुसार सार्वजनिक ठिकाणी, कामाचे ठिकाणी व वाहतूकी दरम्यान तोंडाला मास्क वापरणे बंधनकारक करणेत आलेले आहे.

आणि ज्याअर्थी, साथरोग अधिनियम १८९७ कलम (३) मधील तरतुद व महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० मधील नियम ११ नुसार कोणतीही व्यक्ती , संस्था अथवा संघटना यांनी या नियमावलीत नियमाचे उल्लंघन केल्यास ते भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) चा कलम १८८ नुसार दंडनीय / कायदेशीर कारवाईस पात्र राहतील व या नियमानुसार प्राधिकृत अधिकारी उपरोक्तनुसार व वेळोवेळी शासनाने या नियमानुसार दिलेल्या सुचनांचे उल्लंघन करणाऱ्यांविरूध्द दंडनीय कारवाई करणेस सक्षम असेल असे नमुद आहे.

मागे पहा..

त्याअर्थी, मी कैलास जाधव , आयुक्त, नाशिक महानगरपालिका मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र कोविड -१९ उपाययोजना नियम २०२० मधील नियम १० नुसार नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी , कामाचे ठिकाणी व वाहतूकी दरम्यान जे नागरीक मास्कचा वापर करणार नाही अशा नागरीकांविरूध्द भारतीय दंड संहिता कलम १८८ व २९० चे तरतुदीनुसार र.रू.२००/- (अक्षरी र.रू.दोनशे मात्र) दंडात्मक कारवाई करणेकामी आदेश पारित करीत आहे.

यापूर्वी संदर्भ क्रमांक ५ अन्वये आदेश पारित केला असता सदर आदेशाचे नागरिकांकडून पालन होत नसल्याचे दिसून येत आहे तरी जे नागरिक तोंडावर मास्कचा वापर करणार नाही अशा नागरिकांविरुध्द दंडात्मक कार्यवाही कडक करण्यात यावी.

तसेच, नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी , कामाचे ठिकाणी व वाहतूकी दरम्यान तोंडावर मास्क न वापरणाऱ्या व्यक्तींविरूध्द र .रू.२००/- (अक्षरी र.रू.दोनशे मात्र) दंडात्मक कारवाई करणेकामी विभागीय अधिकारी, पंचवटी/ ना.पुर्व /ना.रोड/ ना.पश्चिम /सातपूर/ नविन नाशिक (सिडको) विभाग यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात प्राधिकृत करण्यात येत आहे.

तसेच, पशुवैद्यकिय अधिकारी , संबंधित प्रशासकीय विभागातील विभागीय स्वच्छता निरीक्षक/स्वच्छता निरीक्षक हे त्यांच्या अधिनस्त असलेल्या विभागातील ठिकाणी उपरोक्त कारवाई करणेस सक्षम असतील. सदरहू आदेशाप्रमाणे अनुसरणेत आलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियमितपणे घनकचरा व्यवस्थापन विभाग (मुख्यालय) येथे विभागीय अधिकारी यांनी दर आठवडयास व महिन्यास सादर करावा.

**Sd/-**

**(कैलास जाधव, भा.प्र.से.)**
**आयुक्त,**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

प्रत:- रवाना

१. सर्व खाते प्रमुख / विभाग प्रमुख
२. संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग
३. पशुवैद्यकिय अधिकारी
४. सर्व विभागीय अधिकारी
५. सर्व विभागीय स्वच्छता निरीक्षक
६. सर्व स्वच्छता निरीक्षक
७. स्थळ प्रत